# ऋणनिर्देश

"श्याम कुरळे यांच्या कथालेखनाचा अभ्यास" या विषयाचा अभ्यास व लेखन करीत असताना अनेक व्यक्तींचे जिव्हाळ्याचे व आपुलकीचे सहकार्य लाभले.

माझे मार्गदर्शक डॉ. जी. पी. माळी सर यांचे अनमोल मार्गदर्शन मला लाभले. प्रबंधाच्या विषय निवडीपासून ते शेवटपर्यंत त्यांनी वेळोवेळी प्रोत्साहन देऊन माझा उत्साह वाढविला म्हणून मी हे काम पूर्ण करून शकलो. माळी सरांचा सहृदयी स्वभाव सर्वांच्याच परिचयाचा आहे. पण संशोधनातील करडी शिस्तही त्यांच्याकडून मार्गदर्शन घेणाऱ्या प्रत्येक अभ्यासकांना अनुभवावी लागते. त्यातून स्वत:चा विद्यार्थी सर्वतोपरी विद्या नैपुण्य व्हावा यासाठीच त्यांचा अट्टाहास असतो, म्हणून त्यांचे लाभलेले मार्गदर्शन म्हणजे जीवनभरचा ठेवा जपून ठेवावं इतका मी भाग्यवान ठरलो. संशोधनातील करडी शिस्त पण मनातून विद्यार्थ्यांबद्दल अपार दयार्द्रवृत्ती जोपासणाऱ्या सरांनी मला वेळोवळी माझ्या उणीवातून मला सतत प्रोत्साहन देऊन हे काम करण्यास उद्युक्त केले. संशोधनाच्या निमित्ताने कधी कॉलेजवर तर कधी घरी जावे लागे. तेव्हा तेव्हा सरांनी दिलेली वागणूकही सरांबद्दल आणखीन आदर वाढवणारी ठरली. विद्यार्थ्याला आपल्या कुटुंबापैकी एक समजणारे माळीसर लाभल्याचा आनंद मला शब्दात व्यक्त करता येत नाही. सरांच्या घरच्या कुटुंबियांचीही सहकार्याची भूमिका म्हणजे सरांचा संस्कारशीलपणा हा मला अनुभवता आला. मी हॉटेलमध्ये काम करत एम. फिल. करतो याचे कौतुक सर इतरांना वेळोवेळी बोलून दाखवित त्यावेळी सरांच्या माझ्यावरील विश्वासाने मी भारावून गेलो. माझ्या कामातून मी ज्या ज्यावेळी जाईन त्या त्यावेळी सरांनी माझ्यासाठी वेळ काढला म्हणूनच हा लघुप्रबंध पूर्णत्वास गेला. माळीसरांचे ऋण मी शब्दात कसे व्यक्त करू, त्यांच्या ऋणात राहणे मी माझे भाग्य समजतो.

शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. हिमांशू स्मार्त यांनी हा लघुप्रबंध पूर्ण करण्यास प्रेरणा देऊन वेळोवळी आत्मीयतेने सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. डॉ. कृष्णा किरवले यांना मी कोणत्या परिस्थितीतून येथपर्यंत आलो याची माहिति होती. त्यांनी केलेले मार्गदर्शन प्रोत्साहनपर असेच ठरले. त्यांचे ऋण मी शब्दात व्यक्त करू शकत नाही.

या प्रबंधलेखनात लेखक श्याम कुरळे यांनी स्वत: वेळोवेळी पुस्तकांचे, लेखांचे संदर्भ देऊन एम. फिल.च्या संशोधनकार्यासाठी माहिती उपलब्ध करून दिली. हे त्यांचे सहकार्य मला संशोधनास खूप उपयुक्त ठरले. लेखक श्याम कुरळे या निगर्वी व बहुआयामी

व्यक्तिमत्त्वाच्या साहित्यिकाचा अभ्यास करताना त्यांचा सहवास लाभला. कुरळे सरांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व हे भारावून टाकणारे असे आहे. त्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचा प्रभाव माझ्यावर नकळत पडत गेला. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या आपुलकीचाही मला अनुभव आला. कुरळेसरांसारख्या एका प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची माझ्यावर छाप पडत गेली. त्यांनी केलेले सहकार्य शब्दातीत आहे. त्यांच्या ऋणातच राहणे मी पसंत करेन.

या लघुप्रबंधाच्या जडणघडणीत मला प्रमोद चव्हाण सरांनी (पर्यावरणशास्त्र) मोलाचे सहकार्य केले. प्रत्येक बाबतीत त्यांनी मला अडीअडचणीतून बाहेर काढले. आर्थिक बाबतीत योग्य वेळी मदत करून हा लघुप्रबंध पूर्णत्वास नेण्याचे श्रेय त्यांनाच द्यावे लागेल. त्यांचे ऋण मी कायम मनात ठेवेन.

या संशोधनात खारीचा वाटा उचलणारे माझे सहकारी मित्र सुनिल बुद्धनावर, अशोक गावडे, विठ्ठल रणदिवे, अमोल कांबळे , सखाराम गुरखे यांचा मी आभारी आहे. तसेच मला नेहमी प्रोत्साहित करणारे श्री. पी. के. कांबळे, श्री. एस. आर. मगदूम (अध्यापक), श्री. विजय रेवणसिद्ध जाधव, श्री. नितीन कांबळे, श्री. टी एस. कांबळे, श्री. एम. एस. नामे, श्री. मारूती दांगट, श्री. कमल दवे, श्री. सुनिल सुतार, श्री. विजय रानमाळे, श्री. शिवराज कांबळे, माझे स्नेही श्री. प्रदिप कांबळे, श्री. कुंडलिक दाभोळे, श्री. मारूती कांबळे आणि माझ्याबद्दल अपार सहानुभूती बाळगणारे माझे जिवलग मित्र श्री. शिवाजी विश्वास पाटील, श्री. संजय खोचारे, श्री. मनोहर काटे, श्री. अजय आजगेकर, श्री. ए. डी. पाटील, श्री. सुनिल बुराण, श्री. आनंदराव चौगले, श्री. आंनदराव नाझरे आणि माझ्या आतापर्यंतच्या वाटचालीत मला घडविणारे माझे मामा कै. श्री. परसू साताप्पा कांबळे यांना मी खूप मोठा झालेले पाहायचे होते ते आज हयात नाहीत याचे मनस्वी दु:ख होते. माझ्या बालपणापासून आजपर्यंत ज्याने मला वेळोवेळी मदतीचा हात दिला तो माझा मित्र श्री. नामदेव दादू यादव याचा मी कायमचा ऋणी आहे. तसेच श्री. जयराम पाटील, श्री. मधुकर देसाई, श्री. पी. एस. कांबळे, प्रा. शहाजी कांबळे, प्रा. व्ही. व्ही. क्षीरसागर, प्रा. डी. बी. गावडे, प्रा. संजय देशपांडे, श्री. आवळेसाहेब, श्री. भूतकरसाहेब व कै. श्री. राम पिसे यांचा मी ऋणी आहे.

माझ्या संशोधनाला प्रेरणादायी ठरणारी माझी सुविद्य व सुशील पत्नी सौ. अलका व आम्हा उभयतांच्या संसाररूपी बागेतील दोन चिमुकली सुंदर फुलपाखरे कु. अनिरूद्ध व प्राची यांच्या लडीवाळ सहवासाने कष्टातही उमगलेला आनंद मला प्रेरणादायी ठरला. याबद्दल त्यांनी मला कायम ऋणात ठेवले आहे. माझी सासू श्रीमती सुनंदा नागोजी कांबळे व मेहुणी सौ. संगिता धनाजीराव कांबळे, श्री. संजय कांबळे व माझे मित्र श्री. गौतम कांबळे यांच्या सहकार्याने मी येथपर्यंत आलो त्यांचेही ऋण आहेत.

१९७२ च्या भीषण दुष्काळात ज्यांनी संसाराला सुरूवात केली अन् त्यांच्या आयुष्यातील दुष्काळ कधीच संपला नाही असे माझे आईवडील कै. श्रीपती साताप्पा येसरे व कै. सौ. अनुसया श्रीपती येसरे यांनी अत्यंत बिकट परिस्थितीत मला व माझा भाऊ कै. तानाजीला मोठे करताना खूप खस्ता खाल्ल्या. या कष्टमय जीवनातच त्यांनी इहलोकी प्रयाण केले. याचे दु:ख नेहमी सलत राहते. मी तिसरीत असताना गावातील परसु बुडक्याबरोबर हातात पडळी घेऊन खळ्याला पाठविणारी माझी अशिक्षित आई आज असती तर, तिचा आनंद द्विगुणीत झाला असता. मला नेहमी मोठा हो! म्हणणारे माझे वडील माझे यश पाहण्यास आज उपस्थित नाहीत ही सल नेहमीच मनात राहणारी. त्यांच्या त्या कष्टमय दिवसातून व त्यांच्या एका पाठोपाठ निघून जाण्याने माझा दैववादावरून व नियतीवरून विश्वास उडाला. पुढे अनेक कठीण प्रसंगांचा सामना करताना त्यांचे कष्ट मला नेहमी जाणवत राहिले. अगदी दहावीपासून मी हॉटेलमध्ये काम करत शिक्षण घेतले. शिक्षण, काम यांचा समन्वय साधत शिक्षण घेताना हॉटेल सनरेजचे मालक श्री. रमेश बासरानी, श्री. अजय बासरानी, श्री. मुरारी बासरानी यांनी मला शिक्षणासाठी वेळ उपलब्ध करून दिला. श्री. रमेश बासरानी यांच्या आपुलकीच्या वागणुकीने माझ्यावर त्यांच्या संस्काराचा पगडा पडत गेला. या सर्वांचे ऋण कित्येक आहेत. माझे सहकारी मित्र श्री. भागोजी आडूळकर, श्री. अनिल सतिजा, श्री. मोहन इंदलकर, श्री. दयानंद गवस यांचाही मी ऋणी आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सेवकवर्ग त्यात श्री मातेकर, वसंत दिंडे यांनी वेळोवळी सहकार्य केले. त्यांचा मी आभारी आहे. तसेच इतरही काही अडचणीत मदत करणारे मित्र श्री. सतिश कुसुंबे, श्री. विजय पोवार व श्री. दिंगबर श्रीपती निळकंठ यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचा मी आभारी आहे.

या प्रबंधाच्या टंकलेखनाच्या कामात ज्यांनी कष्ट घेतले ते श्री. संजय स. पसारे यांनी हा लघुप्रबंध सुबक बनविला त्यांचेही मी आभार मानतो.

या लघुप्रबंध लेखनास अशा अनेक ज्ञात अज्ञात व्यक्तींनी मला सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

स्थान : कोल्हापूर
दिनांक :

**श्री. बबन श्रीपती येसरे**
संशोधक

# अर्पणपत्रिका

वडील कै. श्री. श्रीपती साताप्पा येसरे

व

आई कै. सौ. अनुसया श्रीपती येसरे


यांना अर्पण !!

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| पहिले | श्याम कुरळे यांचा परिचय | १ – १२ |
| दुसरे | मराठी कथेची परंपरा | १३ – ५० |
| तिसरे | श्याम कुरळे यांच्या कथांचा परामर्श | ५१ – ११६ |
| चौथे | श्याम कुरळे यांच्या कथांची वैशिष्ट्ये व वेगळेपण | ११७ – १४६ |
| पाचवे | श्याम कुरळे यांच्या कथांचे वाङ्मयीन परीक्षण | १४७ – १८६ |
| सहावे | समारोप | १८७ – १९६ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | १९७ – १९८ |
| | परिशिष्टे | १९९ – २०५ |

अक्षर यात्री



श्री. श्याम कुरळे